# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०६/२०२४ (शुक्रवार) सकाळ


## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १३/०६/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे खापरखेडा परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, चनकापूर येथे राहणारा रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार नामे आशिष उर्फ गुल्लु राजबहादुर वर्मा रा. चनकापुर, खापरखेडा हा मिलन चौक खापरखेडा येथे माऊजर सह येणार आहे. अशा माहितीवरून पथकाने सदर ठिकाणी १८.४५ वाजता सुमारास सापळा रचून त्यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीत त्याचे कमरेला एक देशी बनावटीचे लोखंडी माऊजर किंमती २५,०००/— रू. आणि मॅगझिन मध्ये ०२ जिवंत काडतूस किंमती २०००/— रू. असा एकूण २७०००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आला. त्यास सदरचे अग्निशस्त्र कुठून आणले याबाबत विचारणा केली असता सन २०१७ मध्ये लखनसिंग सरदार रा. खरगोन, मध्यप्रदेश याने साहुली येथे आणून दिल्याचे सांगितले. दोन्ही आरोपी इसमाविरुद्ध पो.स्टे. खापरखेडा अप. क्र. ३२३/२४ कलम ३, २५ भारतीय शस्त्र अधि. अन्वये गुन्हा नोंद करून पुढील कार्यवाहिकामी पो.स्टे. खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि किशोर शेरकी, पो.हवा. रोशन काळे, पो.हवा. आशिष मुंगळे, पो.हवा. नितेश पिपरोदे, पो.हवा. शंकर मडावी, पो.हवा. उमेश फुलबेल, नापोशी विरेंद्र नरड, नापोशी विपीन गायधने, चापो.हवा अमोल कुथे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर